महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४४ वा दिनांक : ०८/११/२०२४ वार : शुक्रवार

## राहुल गांधी यांच्या केसाला जरी धक्का लावला तर देश पेटून उठेल : नाना पटोले



**नागपूर :** कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात येऊन जातिनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार असल्याचे जाहीर करत थेट भाजपला मोठे आव्हान निर्माण केले आहे. त्यानंतर भाजपने राहुल गांधी यांना नक्षल समर्थक असल्याचा आरोप देखील केला आहे. यावर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर टीका केली आहे. राहुल गांधींचे तोंड बंद करण्यासाठी खोट्या केसेस दाखल केल्या जात असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले, राहुल गांधींनी जी भूमिका मांडली त्यामुळे भाजप घाबरली आहे. ते सर्वसामान्य जनतेचा आवाज देशभर पोहोचवत असल्याने त्यांना अडवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यांचे तोंड बंद करण्यासाठी त्यांच्यावर खोट्या केसे दाखल केल्या जात आहेत, असा आरोप नाना पटोले यांनी केला आहे. तसेच राहुल गांधींच्या केसाला जरी धक्का लावला तर आम्ही सरकार पाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील नाना पटोले यांनी दिला आहे.

**उठेल** नाना पटोले पुढे म्हणाले, राहुल गांधींच्या आक्रमक भूमिकेला भाजप घाबरली आहे. त्यामुळे खोट्या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न होत आहे. राहुल गांधींच्या मागे सीबीआय चौकशी लाऊन त्यांना महाराष्ट्रात प्रचार करता येणार नाही असे प्रयत्न केले जात आहेत. मात्र राहुल गांधी घाबरणारे नेते नाहीत. त्यांच्या केसाला जरी धक्का लावला तर देश पेटून उठेल.

नाना पटोले म्हणेल, महाराष्ट्रात ६७ हजार महिला गायब झाल्या, त्यांच्यावर अत्याचार झाले. असे असतानाही कारवाई होत नसल्याने कोर्टाला सुमोटो याचिका दाखल करावी लागली. ही सरकारची नामुष्की आहे. पुढे राज ठाकरे यांच्यावर देखील त्यांनी टीका केली आहे. राज ठाकरे यांना सांविधानिक व्यवस्थेची कल्पना नाही. ते राज्यकर्ते असल्यासारखे तोऱ्यात वागतात आणि बोलतात. मनसेचे भोंगे विधानसभेच्या निवडणुकीत जनताच बंद करणार आहे, असे नाना पटोले म्हणाले.

## संजय राऊत मविआचे डुक्कर — खोत यांची चीभ घसरली



**मुंबई :** महायुतीचे आमदार सदाभाऊ यांनी शरद पवार यांच्यावर वादग्रस्त विधान केले होते. ते प्रकरण तापलेले असतानाच त्यांनी आता खासदार संजय राऊत यांच्यावर देखील खालच्या पातळीवर टीका केली आहे. डुकराला कितीही साबण शांपू लावला तरी डुक्कर गटारीतच जाते, अशी टीका सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

सदभाऊ खोत यांनी शरद पवारांवर केलेल्या वादग्रस्त टीकेनंतर त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे. त्यात संजय राऊत यांनी थोबाडीत द्यायला हवी होती, अशी टीका त्यांच्यावर केली होती. यावर संजय राऊत यांना प्रत्युत्तर देताना सदभाऊ खोत म्हणाले, २०१९ मध्ये तुम्ही भाषण करत होता. सत्तेत आल्यावर तुम्ही पहिला खंजीर हातात घेतला. तुमच्यात इमानदारपणा आहे का शोधा आणि कुत्र्याएवढा जरी इमानदारपणा असता तर महाराष्ट्राने तुमचे कौतुक केले असते. तरीही मला त्याच्यावर जास्त काही बोलायचे नाही कारान डुकराला कितीही साबण शांपू लावला तरी डुक्कर गटारातच जातं, अशी टीका सदाभाऊ खोत यांनी संजय राऊत यांच्यावर केली.

सदभाऊ खोत पुढे म्हणाले, संजय राऊतला गावगाडा माहिती नाही, त्यामुळे राखण करणारा कुत्रा म्हणजे काही माहित नाही. पण तुम्ही २०१४ आणि २०१९ ला नरेंद्र मोदी यांचा फोटो गळ्यात अडकवून मतांचा जोगवा मागत गावोगावी फिरत होतात. अशा शब्दात सदभाऊ खोत यांनी संजय राऊत यांच्यावर पलटवार केला. त्यामुळे आधीच शरद पवारांवरील वादग्रस्त टीकेमुळे चर्चेत आलेले खोत पुन्हा एकदा आता चर्चेत आले आहेत.

## मुरुम पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्षा ची स्थापना करावी अंनिसची मागणी



मुरूम, ता. उमरगा येथील पोलीस ठाण्यामध्ये अंनिसच्या वतीने संदिप दहीफळे यांना निवेदन देताना महेश मोटे, सुधीर पंचगल्ले, अप्पासाहेब सुर्यवंशी, संतोष कांबळे व अन्य.

**मुरुम, ता. उमरगा, (प्रतिनिधी) :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानानंतर महाराष्ट्रात २०१३ साली जादूटोणाविरोधी कायदा लागू झाला आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्याच्या प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये 'अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष' स्थापन करणेबाबत पोलीस अधीक्षकांना नुकतेच परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

पोलीस महासंचालकांच्या या परिपपत्रकानुसार मुरुम शहर पोलीस स्टेशनमध्ये ‘अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष’ सुरू करावे अशी मागणी शुक्रवारी (ता. १) रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिष्टमंडळाने सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली.

यावेळी मअंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. आप्पासाहेब सुर्यवंशी, सहशिक्षक संतोष कांबळे, सामजिक कार्यकर्ते महेंद्र कांबळे, पत्रकार हुसेन नुरसे, मोहन जाधव आदी उपस्थित होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात अंनिसने म्हटले आहे की, राज्यातील सर्वच पोलीस स्टेशनमध्ये जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावेत असा आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाने १९ जुलै २०२४ रोजी काढला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने महाराष्ट्र पोलिसांच्या या आदेशाचे स्वागत केले आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्थापन करणे हे महाराष्ट्र पोलिसांचे आश्वासक पाऊल आहे. यामुळे जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होईल. राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. छेरिंग दोरजे यांच्या सहीने असलेल्या आदेशान्वये, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ च्या कलम ५ (१) अन्वये, महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन महाराष्ट्र शासन सदर अधिनियमातील कलम ५ (२) मध्ये उद्धृत केलेली कर्तव्ये पार पाडण्याकरीता पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात सहाय्यक आयुक्त (गुन्हे) तसेच पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रात पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) यांची दक्षता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याच्या तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये एक कक्ष स्थापन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्याच्या प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करणेबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची गेल्या अनेक दिवसांपासूनची एक मागणी या निमित्ताने पूर्ण झाली आहे. यानिमीत्ताने डॉ. नरेंद्र दाभोलकरांना हे एक कृतिशील अभिवादन ठरेल अशी अपेक्षाही अंधश्रद्धा निर्मूलन समितीने व्यक्त केली आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०८ नोव्हेंबर २०२४


## उत्पादन वाढीसाठी पिकावर फवारणीसाठी देशी दारूचा वापर

**आर्णी** : सध्या तुरीचे पीक फुलोऱ्यात येण्यापूर्वी किटकनाशके फवारणी करणे गरजेचे आहे. अशातच आता उत्पादन वाढी करीता फवारणीतुन देशी दारू मारा असा सल्ला पसरला असल्याने शेतकरी देशी दारू फवारणी करीत असल्याचे पहायला मिळत आहे. तुरीचे पीक फुलोऱ्यात असताना शेतकरी पिकांची विशेष काळजी घेतात. योग्य वेळी फवारणी हे या पिकाच्या उत्पादनात वाढ करते. त्यामुळे शेतकरी जे माहिती मिळते त्यानुसार फवारणी करतात.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य सल्ला दिला जात नाही. शेतकऱ्यांना कोणाच्या सांगण्यावरून फवारणी करीता किटकनाशके वापरावी लागते. विशेष म्हणजे जे दारु पित नाही त्यांच्या हातात दारुची बाटली दिसत आहे त्यावरून देशी दारूची फवारणी चर्चेत आली आहे. काही दिवसापासून ही फवारणी होत आहे. यामध्ये चांगले उत्पादन वाढी करीता ही फवारणी असल्याचे शेतकरी सांगतात. दारू फवारणी करण्याची सर्वत्र शेतकऱ्यांची धडपड पहायला मिळत आहे.

कृषी विभागाचे उत्पादकता वाढ अभियान शेवटी कागदावर शासनाने कृषी विभागा अंतर्गत पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न करताना विशेष अभियान सुरू केले आहे. मात्र तालुका कृषी कार्यालया कडून नियोजित वेळेत मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात येत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना मार्गदर्शन होत नाही. मोजक्या ठिकाणी कार्यशाळा आयोजित करून देखावा केला जातो.

## दिवाळी पहाट निमित्त धोपटेश्वर नगरीत रंगली सुरांची महफिल




**बदनापूर (डॉ. रामेश्वर पाटील)** : दि. २ नोव्हेंबर रोजी दिवाळी पाडव्यानिमित्त सकाळी ७ वाजता स्वर साधना संगीत विद्यालयाने आयोजित केलेल्या सुरमयी दिवाळी पहाट कार्यक्रमामध्ये विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सुरांनी वातावरण चैतन्यमय झाले होते. एकदंताय वक्रतुण्डाय गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भूप रागामध्ये गायलेल्या हरी सुंदर नंद मुकुंदा भजनाने वातावरण भक्तीमय झाले होते.

अच्युतम केशवम जयस्तुते यासारख्या समूहगीतांनी श्रोत्यांना तालाचा ठेका धरायला लावला. भैरव रागात जागो मोहन प्यारे बंदिश, ओंकार प्रधान रूप गणेशाचे, अबीर गुलाल उधळीत रंग, कानडा राजा पंढरीचा, अवघे गरजे पंढरपुर, ऐसी लागी लगन अशी विविध भजने तसेच मर्म बंधातली ठेव ही हे नाट्यगीत, केव्हातरी पहाटे हे भावगीत विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमाचा समारोप भैरवी रागातील सावळे परब्रम्ह या अभंगानी केला.

कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील रसिक श्रोते तसेच ग्रामस्थ उपस्थित राहुल चिमुकल्यांच्या गायनाला दाद देत होते.

उपस्थित मान्यवरांनी चिमुकल्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.कार्यक्रमाची सुरुवात तालुक्यातील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती मातेचे पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी डॉक्टर रामेश्वर पाटील, कैलास शेठ दुधानी, सरपंच किशोर फुलमाळी, उपसरपंच नंदू दाभाडे, माऊली गव्हाणे विलास बापू देशमुख, संतोष वरकड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णु महाराज बारड यांनी केले. कार्यक्रमात साथसंगत साठी महाराष्ट्रातील दिग्गज कलाकार उपस्थित होते.

तबल्यासाठी संदीप गुंजकर, जय कराड पखवाज विठ्ठल काळे, शिवराज चव्हाण, बळीराम गवारे, माऊली भांबर्गे तर गायन साथ संतोष वाघ,शुभम घेवारे आणि काकाजी खैरे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी विद्यालयाचे संचालक संगीत विशारद श्री.तुळशीरामजी दाभाडे, स्वर साधना संगीत परिवारच्या संपूर्ण टीमने अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण तुळशीराम दाभाडे ऑफिशियल या यूट्यूब चॅनल वरून करण्यात आले होते. यासाठी सिद्धेश्वर शेळके, जालिंदर सोरमारे, आणि मंगेश मांगडे यांनी सहाय्य केले. कार्यक्रमासाठी ध्वनी व्यवस्था श्री चैतन्य साऊंड जालना तर रंगमंच व्यवस्था सत्संग मंडप डेकोरेशन अकोला यांनी सहकार्य केले.

## बंजारा समाज बांधवांच्या वतीने पोहरादेवी येथे कार्यक्रमाचे आयोजन



**पोहरादेवी** : बंजारा गुरुगादीचे पिठाधीश बाबूसिंग महाराज यांना राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य म्हणून संधी देण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल गोर बंजारा समाजाच्या वतीने तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

राज्याचे राज्यपाल यांनी गत महिन्याच्या पंधरा तारखेला सामाजिक सेवेत योगदान देणाऱ्या राज्यातील ७ नागरिकांची विधानपरिषद सदस्य म्हणून नेमणूक केली. यात बाबूसिंग महाराज यांचा देखील समावेश आहे. बाबूसिंग महाराज हे बंजारा गोरपिठाची गुरु परंपरा चालवीत असून दिवंगत संत डॉ. रामराव महाराज यांच्या पश्चात उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड महाराज परिवारातून करण्यात आली आहे. यामुळे देशभरात पसरलेल्या गोरबंजारा समाजामध्ये आदराचे स्थान विधान परिषद सदस्य बाबुसिंग महाराज यांना आहे. पोहरादेवी येथील दानशूर बामनलाल महाराज देवस्थान येथे महाराज परिवारातील सदस्यांच्या उपस्थितीत बंजारा समाज बांधवांच्या वतीने राज्याचे राज्यपाल यांच्याकडून विधानपरिषद सदस्य म्हणून केलेल्या नेमणुकीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०८ नोव्हेंबर २०२४


## जाहिरातीवरून आघाडी-युतींच्या एकमेकांविरोधात तक्रारी




**मुंबई :** महाविकास आघाडीच्या एका जाहिरातीमधून उपमुख्यमंत्री अजित पवारांना लक्ष्य करत त्यांचे पात्र दाखवण्यात आले आहे. आता, या जाहिरातीविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना पत्र लिहून जाहिरातीमधील मजूकर आणि अजित पवारांच्या पात्राचा उल्लेख करत तक्रार दाखल केली आहे.

या जाहिरातीच्या माध्यमातून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न महाविकास आघाडीच्यावतीने केला जात असल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. बदनामीकारक मजकूर, खोटे वृत्त आणि वादग्रस्त आशयाची व्हिडिओ जाहिरात बनवून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सूरज चव्हाण यांनी तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही पत्रातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या जाहिरातीमध्ये एका महिला भगिनीशी बोलताना अजित पवार हे महिन्याला तुम्हाला दीड हजार रुपये दिले ना असे सांगताना दिसून येतात. मात्र, ह्या दीड हजारांचा दादा तुमचा वाद फसवा असल्याचे ती महिला म्हणते. गुलाबी जॅकेट आणि ढोकळा खाताना अजित पवारांचे पात्र जाहिरातीमध्ये साकारण्यात आल्याचं दिसून येत आहे. महागाई वाढल्याने महाराष्ट्र त्रस्त असून तुम्ही तुमच्या सत्तेत मस्त असल्याचेही जाहिरातीमधील महिला अजित पवारांचे पात्र साकारलेल्या व्यक्तीला बोलताना दिसून येते.

सध्या, सोशल मीडियावर ही जाहिरात चांगलीच व्हायरल झाली आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. १५०० रुपयांत काही होत नाही, कारण महिन्याचा खर्च १५ हजारांवर गेलाय, खोटा दादा, फसवा वादा, असेही जाहिरातीमधून म्हटले आहे.

तर दुसरीकडे भाजपने एक खोटी जाहिरात दिल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेसने वेगवेगळ्या राज्यात खोट्या गॅरंटी दिल्या त्या पूर्ण केल्या नाहीत अशी जाहिरात केली आहे. हे खोटे आम्ही निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. तसेच भाजपवर कारवाई करण्याची मागणी केल्याचे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी सांगितले आहे.

# भाजपने डॉग स्क्वॉड बाळगले आहे : जयंत पाटील



**मुंबई :** महायुतीचे आमदार सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांवर केलेल्या टीकेनंतर त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून टीकेची झोड उठली आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी देखील आता सदाभाऊ खोत यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. भाजपने डॉग स्क्वॉड बाळगले आहे, अशी टीका जयंत पाटलांनी केली आहे.

जयंत पाटील सदाभाऊ खोत यांच्या वादग्रस्त विधानावर टीका करताना म्हणाले, ही दुर्दैवी घटना आहे. अशी माणसे भाजपने बाळगली आहेत. डॉग स्क्वॉड बाळगले आहेत. या प्रकाराला देवेंद्र फडणवीस यांचे समर्थन आहे का? असा सवाल उपस्थित करत याचा खुलासा करण्याचे आव्हान जयंत पाटलांनी केले आहे. तसेच सदाभाऊ खोत यांनी असे वक्तव्य केले आहे याचे प्रायश्चित्त करावे लागेल. भाजपमधील काही लोक शरद पवार साहेबांवर खालच्या पातळीवर टीका करतात आणि आमदारकी मिळवत असतील तर भाजपचा विचार त्यांना लखलाभ, असे जयंत पाटील म्हणाले.

दरम्यान, सदभाऊ खोत यांनी केलेल्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर सदभाऊ खोत यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. सदभाऊ खोत म्हणाले, मी बोललेली भाषा ही गावगड्याची भाषा आहे. कोणाच्या व्यंगाला उद्देशून बोलण्याचा माझा हेतू नव्हता. परंतु काही लोकांनी त्या शब्दांचा विपर्यास केला. त्यातून कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर ते शब्द मी मागे घेतो. मी दिलगिरी व्यक्त करतो.

पुढे बोलताना सदभाऊ खोत म्हणाले, एखादी व्यक्ती आभाळाकडे बघून बोलत असेल तर आम्ही त्याला आरशात बघ असं म्हणतो. गावगाड्याची भाषा समजायला मातीमध्ये रुजावं लागतं. मातीमध्ये राबावं लागतं. मातीमध्येच मरावं लागतं. त्यानंतरच गावाकडची आणि मातीची भाषा समजते.

शरद पवारांवर टीका करताना सदभाऊ खोत म्हणाले, शरद पवारांनी बँका हाणल्या, कारखाने हाणले, पण एवढे हाणले तरी शरद पवार भाषणात म्हणतात, मला महाराष्ट्र बदलायचा आहे. अरे कसला चेहरा, महाराष्ट्र तुमच्या चेहऱ्यासारखा करणार का? अशा शब्दात सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांवर टीका केली होती.

## जातगणनेतूनच देशाचे वास्तव चित्र समोर येईल : शरद पवार



**नागपूर :** तीन वर्षांपासून आम्ही जातगणना व्हावी अशी मागणी करीत आहोत. जातगणना झालीच पाहिजे. त्यातून देशाचे वास्तव चित्रण समोर येईल. ते आल्यानंतर आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यासंबंधीचा निर्णय होवू शकेल. पण, प्रत्यक्ष जनगणना झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होईल, असे परखड मत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

बुधवारपासून महाविकास आघाडीच्या प्रचाराची सुरूवात झाली. राहुल गांधी, उद्धव ठाकरे यांनी प्रचार सभा सुरू केल्या आहेत. गुरूवारपासून मीही प्रचार मोहीम सुरू केली आहे, असे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या जनतेला बदल पाहिजे आहे. परिवर्तन हवे आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही कामाला लागले आहो, असे पवार यांनी सांगितले. सदाभाऊ खोत तसेच योगी आदित्यनाथ यांच्या विषयीच्या प्रश्नावर बोलणे टाळले.

बुधवारी नागपुरात झालेल्या संविधान सन्मान संमेलनात बोलताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही राज्यघटना अधिक बळकट करण्यासाठी आरक्षणाची ५० टक्के मर्यादेची भिंत पडणारच आहे. जातवार जनगणना मंजूर होणारच,' अशी घोषणा केली. 'आरएसएस, भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे रोखून दाखवावेच,' असे आव्हानही त्यांनी दिले. जातीगणनेमुळे सर्व चित्र स्पष्ट होईल. या देशात आमची काय भूमिका आहे, हे दलित, आदीवासी व मागासवर्गीयांना समजून जाईल. जातगणना विकासाची पद्धत आहे. काहीही करा, जातगणना होणार आहे असे राहुल गांधींनी ठणकावून सांगितले होते. ९०% लोक केंद्र सरकार तसेच खासगी क्षेत्रात उच्चपदावर दिसत नाही अशी टीका त्यांनी केली. जातगणना करणे, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणे हे दोन उद्दिष्ट साध्य करायचे आहे असे ते म्हणाले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०८ नोव्हेंबर २०२४

# भाजपच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांचा शरद पवार गटात प्रवेश



**बीड** - भाजपच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

ठोंबरे यांनी गुरुवारी खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाने पक्षाचे बळ निश्चितपणे वाढेल, याची खात्री असल्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार संगीता ठोंबरे यांची पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# अजित पवार मर्द माणूस, दिलेला शब्द पाळतात : नवाब मलिक




**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नवाब मलिक शिवाजीनगर माणखुर्द मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. भाजपचा नवाब मलिक यांच्या उमेदवारीला विरोध होता. मात्र, अजित पवारांनी विरोधाला न जुमानता नवाब मलिकांना उमेदवारी दिली आहे. त्यानंतर आता आपण नवाब मलिक यांच्या प्रचाराला देखील जाणार असल्याचे अजित पवारांनी सांगितल्यानंतर नवाब मलिक यांनी त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहे. अजित पवार हा मर्द माणूस आहे, ते दिलेला शब्द पाळतात, अशा शब्दांत नवाब मलिक यांनी अजित पवारांचे कौतुक केले आहे.

नवाब मलिक म्हणाले की, अजित पवार हा मर्द माणूस आहेत. दिलेला शब्द दादा पाळतात. आमच्या कठीण काळातही ते पाठीशी उभे राहिले आणि आम्हाला उमेदवारी सुद्धा दिली. आता महायुती आणि महाविकास आघाडी माझ्या विरोधात आहे. मात्र, जनता माझ्यासोबत आहे, असेही नवाब मलिक म्हणालेत.

अबू आझमी यांनी नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांच्यावर टीका केली होती. यावरून नवाब मलिक यांनी अबू आझमींना प्रत्युत्तर दिले आहे. माझा जावई समीर आता आमच्यासोबत नाही, पण त्याच्या बाबतीत असलेली केस आम्ही संपल्यासारखी मानणार नाही.

कोर्टात आम्ही ती लढणारच, आणि त्याच्यावरचा कलंक पुसल्याशिवाय शांत बसणार नाही, असे म्हणत मलिक यांनी अबू आझमींवरही टीका केली. ते म्हणाले की, अबू आझमी मृत व्यक्तीबद्दल बोलत आहेत, जे चुकीचे आहे. मी जर बोलायला सुरुवात केली, तर त्यांना कठीण जाईल. त्यांच्या भावाचा मुलगा कोणाच्या साथीला आहे, इंटरनॅशनल ड्रग्ज माफियासोबत कोणाचा संबंध आहे, हे सगळे मी समोर आणू शकतो, असा इशारा मलिक यांनी अबू आझमींना दिला.

दरम्यान, नवाब मलिक यांचे दाऊदशी संबंध असल्याचा आरोप भाजपने केला होता. त्यामुळे भाजपकडून नवाब मलिक यांच्या उमेदवारीला करण्यात आला होता. मात्र, अजित पवार यांनी नवाब मलिक यांना उमेवारी दिली. त्यानंतर दाऊद आणि त्याच्या भावाच्या केसेसशी संबंध असलेल्या व्यक्तीचा आम्ही प्रचार करणार नाही, अशी भूमिका भाजपने जाहीर केली होती.

तर, आम्ही नवाब मलिक यांना उमेदवारी दिली असून पक्षाचे घड्याळ चिन्ह देखील दिले आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्या रॅलीमध्ये जाणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. अजित पवार आपल्या प्रचारासाठी येणार असल्यामुळे नवाब मलिक यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले.

